महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३Website-www.sscboardkolhapur.inEmail Id- divsec.kop@gmail.com

क्रं.कोविमं/माध्य.गोप/2331
कोल्हापूर- ०४
दिनांक- २१/११/२०२२

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा,सांगली,कोल्हापूर.

**विषय :- राज्यातील सर्व शाळांमधून भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करणेबाबत.**

**संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) संकीर्ण-२०१२/(४५८/१२)/प्राशि-५ (संकेतांक-२०१३०१२९१२१७०५७२२१)**

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच भारतीय संविधानाची पुरेशी ओळख व्हावी म्हणून २६ जानेवारी, २०२० पासून राज्यातील सर्व शाळांमध्ये 'सार्वभौमत्व संविधानाचे जनहित सर्वांचे' हा उपक्रम सुरु करण्यात आला असून त्यानुसार राज्यातील सर्व प्रकारच्या, सर्व माध्यमांच्या सर्व शाळांमधून (राज्य मंडळ व इतर मंडळांशी सल्लग्न) परिपाठाच्या/प्रार्थनेच्या वेळी संविधानाच्या प्रास्ताविकेचे (Preamble) दररोज वाचन करण्यात यावे. राज्यातील सर्व शाळांच्या दर्शनी भागात संविधानाची प्रास्ताविका लावावी अथवा भिंतीवर लिहावी किंवा कायमस्वरुपी फलक लावावा. शाळेतील विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व पालकांना संविधानाची माहिती व्हावी यासाठी संविधान यात्रा, संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा, चित्रकला, निबंध, स्लोगन, पोस्टर्स, समूहगान इ. स्पर्धांचे आयोजन करावे. शाळांमध्ये तज्ञांची व्याख्याने तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन वेळोवेळी करण्यात यावे. तसेच शाळांमध्ये व गावांमध्ये संविधान सभा भरविण्यात याव्यात जेणेकरून विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना संविधानाबाबत माहिती होईल. शाळेतील प्रत्येक कार्यक्रमाची/ समारंभाची सुरुवात प्रास्ताविकेच्या सामूहिक वाचनाने करण्यात यावी.

सोबत : सदर शासन निर्णयांची छायाप्रत.

(डी. एस. पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ कोल्हापूर

राज्यातील सर्व शाळांमधून
भारतीय संविधानाच्या
प्रास्ताविकेचे वाचन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१२/(४५८/१२)/प्राशि-५,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२,

तारीख: ४ फेब्रुवारी, २०१३.

<u>वाचा —</u>

१) शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.जपुती-२२०८/१३३८/प्र.क्र.१०९/०८/२९, दि. २४ नोव्हेंबर, २००८.

<u>प्रस्तावना —</u>

भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता प्राप्त करून देण्याची आणि सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करणारे भारताचे संविधान दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी अंगीकृत आणि अधिनियमित करून देशाला अर्पण करण्यात आले. हे संविधान दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून अमलात आले असले तरी भारतीय संविधानाची माहिती अजूनही बहुतेक नागरिकांना नाही. भारतीय संविधानातील मौलिक तत्त्वे, संवैधानिक हक्क आणि कर्तव्ये स्वतंत्र भारताच्या नागरिकांना संस्कारित करणारी आहेत. ही तत्त्वे शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविणे आणि त्यांना जागरूक नागरिक बनविणे याकरिता संविधानातील तत्त्वांचा प्रसार व प्रचार करणे आवश्यक असल्यामुळे शालेय

1088

जीवनापासूनच विद्यार्थ्यांना संविधानाची पुरेशी ओळख व जागृती करून देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय—

विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच भारतीय संविधानाची पुरेशी ओळख व्हावी म्हणून राज्यातील सर्व प्रकारच्या, सर्व माध्यमांच्या सर्व शाळांमधून (राज्य मंडळ व इतर मंडळांशी सल्लग्न) परिपाठाच्या/प्रार्थनेच्या वेळी संविधानाच्या प्रास्ताविकेचे (Preamble) दररोज वाचन करण्यात यावे. राज्यातील सर्व शाळांच्या दर्शनी भागात संविधानाची प्रास्ताविका लावावी अथवा भिंतीवर लिहावी किंवा कायमस्वरुपी फलक लावावा. शाळेतील विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व पालकांना संविधानाची माहिती व्हावी यासाठी संविधान यात्रा, संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा, चित्रकला, निबंध, स्लोगन, पोस्टर्स, समूहगान इ. स्पर्धांचे आयोजन करावे. शाळांमध्ये तज्ज्ञांची व्याख्याने तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन वेळोवेळी करण्यात यावे. तसेच शाळांमध्ये व गावांमध्ये संविधान सभा भरविण्यात याव्यात जेणेकरून विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना संविधानाबाबत माहिती होईल. शाळेतील प्रत्येक कार्यक्रमाची/समारंभाची सुरुवात प्रास्ताविकेच्या सामूहिक वाचनाने करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०१२९१२१७०५७२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jageshwar Swarup Saharia

Digitally signed by Jageshwar Swarup Saharia
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jageshwar Swarup Saharia
Date: 2013.02.22 13:00:25 +05'30'

(ज. स. सहारिया)

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

२) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,

३) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव,

४) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

५) मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव,

६) मा. अपर मुख्य सचिव/मा. प्रधान सचिव/मा.सचिव, मंत्रालयीन सर्व विभाग,

७) मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,

८) सर्व विभागीय आयुक्त,

९) सर्व जिल्हाधिकारी,

१०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.),

११) सर्व आयुक्त, महानगरपालिका,

१२) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्यापरिषद), पुणे,

१३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,

१४) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,

१५) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,

१६) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),

१७) सर्व प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,

१८) शिक्षण निरीक्षक (दक्षिण/पश्चिम/उत्तर), मुंबई विभाग,

१९) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,

२०) निवडनस्ती — प्राशि-५.

२६ जानेवारी, २०२० पासून राज्यातील सर्व शाळांमध्ये 'सार्वभौमत्व संविधानाचे जनहित सर्वांचे' हा उपक्रम सुरु करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण-२०२०/प्र.क्र.११/एस.डी.-४**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २१ जानेवारी, २०२०

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१२/(४५८/१२)/प्राशि-५,दिनांक ४ फेब्रुवारी,२०१३.

शासन परिपत्रक:-

भारताची राज्यघटना दिनांक २६ नोव्हेंबर,१९४९ रोजी स्वीकारण्यात आली. या निमित्ताने प्रत्येक वर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. हे संविधान दिनांक २६ जानेवारी,१९५० पासून अंमलात आले असून भारतीय संविधानाची पुरेशी माहिती नागरिकांना असणे आवश्यक आहे.

२. भारतीय राज्य घटनेतील मुलतत्त्वांची व्याप्ती व सर्व समावेशकता सर्व नागरिकांना समजावी आणि त्याचबरोबर घटनेतील न्याय,स्वातंत्र्य,समानता व बंधुता ही मुलतत्वे समाज मनावर कोरली जावीत यासाठी संविधानाचा परिपूर्ण परिचय विद्यार्थ्यांना होणे आवश्यक आहे. भारतीय संविधानातील मुलतत्त्वे,संवैधानिक हक्क आणि कर्तव्ये स्वतंत्र भारताच्या नागरिकांना संस्कारित करणारे आहेत. या वयातील मुलांच्या संस्कारक्षम मनात याची रुजवणूक झाल्यास जबाबदार, सुजाण व सुसंस्कृत नागरिक घडविण्यास मदत होईल. त्याविषयीची सुरुवात शालेय जीवनापासून होणे अभिप्रेत आहे यासाठी शाळांमध्ये दररोज परिपाठाच्या वेळी संविधानाच्या उद्देशिकेचे (Preamble) समुह वाचन करण्यात यावे असा निर्णय संदर्भांकित दिनांक ४ फेब्रुवारी,२०१३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. तथापि त्या शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये **'सार्वभौमत्व संविधानाचे जनहित सर्वांचे'** या उपक्रमाच्या अंतर्गत दररोज परिपाठाच्या वेळी संविधानाच्या उद्देशिकेचे (Preamble) समुह वाचन करण्यात यावे. सदर उपक्रमाची सुरुवात दिनांक २६ जानेवारी,२०२० पासून करण्यात यावी.

३. याबाबत मा.आयुक्त (शिक्षण) यांनी सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून नियतकालिक आढावा घ्यावा.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२००१२११५००१११४२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra
Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2020.01.21 15:01:13 +05'30'

( राजेंद्र पवार )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
२) मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
३) आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे,
४) राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई
५) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे
६) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे,
७) शिक्षण संचालक (प्राथमिक) ,शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
८) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक ,
९) प्राचार्य,जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण विकास संस्था (सर्व),
१०) शिक्षणाधिकारी(प्राथमिक/माध्यमिक/निरंतर), जिल्हा परिषद (सर्व) /सर्व शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई महानगरपालिका,
११) प्रशासन अधिकारी (महानगरपालिका/महानगरपालिका) (सर्व),
१२) निवड नस्ती (कार्या.एस.डी.४).